# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## अंतर्गत परिपत्रक

**विषय :- कार्यालयीन गणवेश परिधान करण्याबाबत.**
**संदर्भ :- जावक क्र.एएन/७८३, दि.१५ मार्च, २०२१.**

विद्यापीठातील वर्ग-३ मधील तांत्रिक पदांवर कार्यरत असलेले काही सेवक तसेच वर्ग-४ मधील विविध पदांवर कार्यरत असलेले सर्व सेवक यांनी गणवेश परिधान करणे अनिवार्य असल्याबाबत तसेच इतर तद्नुषंगिक बाबींसंदर्भात यापूर्वी विद्यापीठ परिपत्रक क्र.एएन/७८३, दिनांक १५ मार्च, २०२१ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तरी देखील काही सेवक हे गणवेश परिधान करीत नसल्याचे दिसून येते. सदर बाब कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही. कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करणे ही बाबदेखील महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील अनुषंगिक तरतुदींस अनुसरुन नाही.

सर्व संबंधित सेवकांना यासंदर्भात वारंवार सूचना देऊन देखील, बरेच सेवक विद्यापीठाने दिलेला गणवेश परिधान करीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, जे सेवक कार्यालयीन वेळेत विद्यापीठाने दिलेला गणवेश परिधान करणार नाहीत अथवा संदर्भीय परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार विद्यापीठाने दिलेल्या गणवेशाव्यतिरिक्त इतर पध्दतीने पेहराव करतील, अशा सेवकांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन निश्चितपणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांचा धुलाई भत्ता बंद करण्यात येईल व सदर बाबींची त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जावक क्र.एएन/2522 )
दिनांक 08 JUL 2026 )

**(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
यांना विनंती की,

- सदर परिपत्रक आपल्या विभागातील संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात.
- सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची असल्याने, जे सेवक विद्यापीठ कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान करीत नाहीत, त्या सेवकांची नावे प्रशासन शिक्षकेतर कक्षास दैनंदिन स्वरुपामध्ये कळविण्यात यावीत.

३. सहायक कुलसचिव, मा.कुलगुरु यांचे कार्यालय
४. सहायक कुलसचिव, मा.प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
५. सहायक कुलसचिव, मा.कुलसचिव यांचे कार्यालय
६. सहायक कुलसचिव, सर्वसाधारण विभाग

¨É/2026/Circuar

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

### विषय :- कार्यालयीन गणवेश परिधान करण्याबाबत.

विद्यापीठातील वर्ग - ३ मधील तांत्रिक पदांवर कार्यरत असलेल्या काही सेवकांना तसेच वर्ग - ४ मधील विविध पदांवर कार्यरत असलेल्या सर्व सेवकांना विद्यापीठामार्फत नवीन गणवेश देण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असून संबंधित सेवकांनी कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान करणे अनिवार्य असल्याचे यापूर्वी अनेक वेळा परिपत्रकांव्दारे कळविण्यात आलेले आहे. परंतु त्यानुसार सर्व संबंधित सेवकांकडून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निर्दशनास येत आहे. तसेच काही सेवक हे विद्यापीठाने दिलेला गणवेश परिधान न करणे, गणवेशापैकी शर्ट किंवा पॅन्ट यापैकी एक परिधान करणे किंवा विद्यापीठाने दिलेल्या गणवेशाशी मिळता जुळता असलेला इतर पेहराव करणे, असे प्रकार करत असल्याचे दिसून येते. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही. त्याचप्रमाणे कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करणे ही बाबदेखील महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील अनुषंगिक तरतुदींस अनुसरुन नाही.

सर्व संबंधित सेवकांना यासंदर्भात वारंवार सूचना देऊन देखील बरेच सेवक विद्यापीठाने दिलेला गणवेश परिधान करीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत सदर परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, जे सेवक कार्यालयीन वेळेत विद्यापीठाने दिलेला गणवेश परिधान करणार नाहीत अथवा वर नमूद केल्यानुसार विद्यापीठाने दिलेल्या गणवेशाव्यतिरिक्त इतर पध्दतीने पेहराव करतील, अशा सेवकांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल तसेच त्यांचा धुलाई भत्ता बंद करण्यात येईल व सदर बाबींची त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
जावक क्र. एएन/783 )
दिनांक 15 MAR 2021 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
यांना विनंती की,

- सदर परिपत्रक आपल्या विभागातील संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात.
- सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची असल्याने, जे सेवक विद्यापीठ कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान करीत नाहीत, त्या सेवकांची नावे प्रशासन शिक्षकेतर कक्षास दैनंदिन स्वरुपामध्ये कळविण्यात यावीत.

३. उपकुलसचिव, मा.कुलसचिव यांचे कार्यालय
४. उपकुलसचिव, सर्वसाधारण विभाग
५. सहायक कुलसचिव, मा.कुलगुरु यांचे कार्यालय
६. सहायक कुलसचिव, मा.प्र-कुलगुरु यांचे कार्यालय

C:\Users\Dell\Documents\Non-Teaching\2021\Circular\Class 4.docx